**राज्याचे पुढील २५ वर्षाचे मराठी भाषा विषयक धोरण ठरविण्यासाठी भाषा सल्लागार समितीमार्फत विभागवार सहविचार बैठका घेण्यास मंजूरी देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**मराठी भाषा विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः भासस-२०१२/प्र.क्र.७२/भाषा-४**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

तारीख: १२ एप्रिल, २०१३.

**वाचा :**

१) **शासन निर्णय सा.प्र.विभाग,क्रमांक : भासस-२०१०/प्र.क्र.७४/२०-ब, दि.२२/०६/२०१०.**

२) **शासन निर्णय, मराठी भाषा विभाग, क्रमांक : भासस-२०११/प्र.क्र.२२८/२०-ब, दि.०७/०४/२०११.**

३) **शासन निर्णय, मराठी भाषा विभाग, क्रमांक : भासस-२०११/प्र.क्र.२९ (भाग-२)/भाषा-२, दि.०९/०४/२०१२.**

४) **भाषा संचालक, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.भासस-२०१२/२०११/५-६, दि.२९/१०/२०१२.**

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्याचे पुढील २५ वर्षातील मराठी भाषेचे धोरण ठरविणे, भाषा अभिवृद्धीसाठी नवनवे उपाय व कार्यक्रम सूचविणे व या अनुषंगाने शासनाला मार्गदर्शन करण्यासाठी भाषा संचालनालया अंतर्गत कायमस्वरुपी भाषा सल्लागार समिती संदर्भाधिन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.२२ जून,२०१० अन्वये गठीत करण्यात आली आहे. या समितीचे अध्यक्ष मा. न्या. नरेंद्र चपळगावकर यांनी दिलेल्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या अध्यक्ष पदावर डॉ.नागनाथ कोत्तापल्ले यांची नियुक्ती संदर्भाधिन शासन निर्णय दि.९ एप्रिल,२०१२ अन्वये करण्यात आली आहे.

समितीच्या कार्यकक्षेत येणारे विषय, त्याचा प्राधान्यक्रम व नेहमीचे कामकाज ठरविण्यासाठी भाषा सल्लागार समितीअंतर्गत स्थायी समिती संदर्भाधिन दि.७ एप्रिल,२०११ च्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या बैठकीत "भाषा धोरण अधिकाधिक प्रातिनिधिक व टिकाऊ स्वरुपाचे व्हावे म्हणून भाषा सल्लागार समितीने राज्यातील निरनिराळया विभागातील तज्ज्ञ व मराठी भाषिकांची मते जाणून घेऊन बृहतआराखडा सादर करावा व त्याअनुषंगाने विभागवार बैठका व त्यानंतर जिल्हानिहाय परिषदा घ्याव्यात असा ठराव करण्यात आला". या ठरावानुसार सद्य:स्थितीत मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर अशा एकूण ६ विभागामध्ये सहविचार बैठका घेण्याकरीता त्या त्या विभागाच्या संयोजकांना स्थानिक लेखक, प्राध्यापक/शिक्षक

आणि मराठी भाषा तज्ञ इ.मान्यवरांसोबत बैठकांचे आयोजन करण्यास मंजूरी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:**

राज्याचे पुढील २५ वर्षाचे मराठी भाषा विषयक धोरण ठरविण्यासाठी भाषा सल्लागार समितीस मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर अशा एकूण ६ विभागामध्ये सहविचार बैठका घेण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. समितीचे अध्यक्ष डॉ.नागनाथ कोत्तापल्ले यांच्या सल्यानुसार भाषा सल्लागार समितीतील सदस्यांमधून विभागाचे संयोजक निश्चित करण्यास व ते ते संयोजक विभागवार बैठकांचे स्थळ वेळ व दिनांक निश्चित करुन स्थानिक लेखक, प्राध्यापक/शिक्षक आणि मराठी भाषा तज्ञ अशा जास्तीत जास्त ५० मान्यवरांचा प्रत्येकी एका बैठकीमध्ये सहभाग घेऊन बैठकांचे आयोजन करण्यासही शासन मान्यता देण्यात येत आहे. या ६ बैठका हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंदाजे दोन महिन्याच्या कालावधीत घेण्यात येतील व या बैठकांबाबतचा अहवाल सर्व संबंधित संयोजक भाषा सल्लागार समितीस सादर करतील.

२. विभागवार बैठका घेण्यासाठी समितीचे अध्यक्ष व सदस्य यांना प्रचलित नियमानुसार भत्ते अनुज्ञेय राहतील. तसेच बैठकीमध्ये सहभागी होणाऱ्या स्थानिक लेखक, प्राध्यापक/शिक्षक आणि मराठी भाषा तज्ञ यांना त्या त्या विभागाच्या स्थानिक दरानुसार जवळच्या मार्गाचे प्रवास भाडे अनुज्ञेय राहील.

३. वरीलप्रमाणे एकूण ६ सहविचार बैठका घेण्यासाठी येणारा अपेक्षित खर्च रु.२,७०,०००/- (रुपये दोन लाख सत्तर हजार फक्त) या मर्यादेपर्यंत करण्यास व बैठकीत सहभागी होणाऱ्या स्थानिक मान्यवरांना त्या त्या विभागाच्या स्थानिक दरानुसार बैठकीच्या दिनांकास प्रवास भाडे अदा करण्यास याव्दारे मंजूरी देण्यात येत आहे.

४. या प्रित्यर्थ होणारा खर्च "मागणी क्रमांक झेडएफ-०१, २०५२, सेक्रेटरिएट-सर्वसाधारण सेवा, ०९०, सेक्रेटरिएट, (००) (०२) भाषा संचालक संगणक सांकेतांक क्रमांक २०५२ ५०६३ या लेखाशिर्षाखालील प्रवासासाठी होणारा खर्च "११ देशांतर्गत प्रवास खर्च" या उद्दिष्टाखाली आणि इतर खर्च "१३ कार्यालयीन खर्च" या उद्दिष्टाखाली सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात येईल.

५. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. २६१/१३/व्यय-४, दि.१६/३/२०१३ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०४१५१५४९३३९२३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dethe Lalita S

Digitally signed by Dethe Lalita S
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=MLD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Dethe Lalita S
Date: 2013.04.29 16:43:21 +05'30'

**( ल. शि. देठे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
४. सर्व मा.मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
५. प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
६. प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
७. सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, यांचे स्वीय सहायक,
८. सचिव, मराठी भाषा विभाग, यांचे स्वीय सहायक,
९. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
१०.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर,
११.महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर,
१२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१४.सर्व मंत्रालयीन विभाग,
१५.वित्त विभाग (व्यय-४,सेवा-५,सा.ऊ. व विनियम व अर्थसंकल्प-१४)
१६.मराठी भाषा विभागातील सर्व कार्यासने.
१७.संचालक, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१८.सहायक भाषा संचालक, भाषा संचालनालय, नवी मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर.

१९.संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई

२०.संचालक, दर्शनिक विभाग, मुंबई

२१. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

२२. सचिव, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई

२३. अध्यक्ष व सर्व संबंधित सदस्य, भाषा सल्लागार समिती (भाषा संचालनालयामार्फत)

प्रत- निवड नस्ती.